रे.के.नं. २२/२१

नि.क्र. ३६/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | मोहम्मद इरफान अब्दुल अजीज ठाकूर |
| वय | – | ६५ वर्षे, |
| व्यवसाय | – | व्यापार, |
| राहणार | – | मस्जिद मोहल्ला, उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. कदम यांच्यामार्फत...</u>**

१. आरोपी मुश्ताक माझा मोठा भाउ असून आरोपी क्र. १ व २ त्याची मुले व आरोपी क्र. ४ त्याची सून आहे. ते माझ्या शेजारी राहतात. दिनांक १७.०३.२०२० रोजी मी, माझी पत्नी व पुतण्या आराफत सकाळी १०.३० च्या सुमारास घरामध्ये बसलो होतो. त्यावेळी माझा मुलगा अब्दुल अजीज घरातून बाहेर जाण्यासाठी निघाला. आरोपी व आमच्या घरातून बाहेर जाण्याकरीता एक मुख्य दरवाजा आहे. त्या दरवाजास एक स्प्रिंग आहे. ती स्प्रिंग बसली नाही. त्यामुळे दरवाजा लागला नाही. त्या दरवाजातून माझा मुलगा बाहेर जात असताना आरोपी क्र. १ ते ३ सोबत त्याचा वाद झाला. त्याचा आवाज आल्याने माझी पत्नी नाहिदा बाहेर आली. त्यानंतर मी बाहेर आलो. त्यावेळी आरोपी क्र. १ ते ३ माझ्या मुलाला सलियाने मारत होते. मी त्यांना सोडवण्यासाठी गेलो असता आरोपी मुश्ताकने मला हाताने मारहाण केली. माझी पत्नी देखील सोडवण्यासाठी आली. त्यावेळी आरोपी रिहानाने तिला हाताने मारहाण केली.

२. आरोपी क्र. १ व २ यांनी माझ्या मुलास सलियाने डोक्यात मारल्यामुळे त्याच्या डोक्यात जखम झाली. त्यानंतर आराफतने येउन आमची भांडणे सोडवली. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. तेथे आम्ही तक्रार देउन मुलगा अजिज यास उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. आता मला मुद्देमाल आर्टीकल अ सलिया दाखवण्यात आला. त्यानेच आरोपींनी माझ्या मुलास मारहाण केली. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. गांगण यांच्यामार्फत...**

३. हे म्हणणे खरे नाही की, माझा जबाब नोंदवताना पोलीसांनी मला आरोपींनी गुन्हयात वापरलेले हत्यार दाखवले होते. हे म्हणणे खरे आहे की, सलिया व पाईप या दोन वेगळ्या वस्तू आहेत. पोलीसांना जबाब देताना मी आरोपी क्र. १ ते ३ यांनी सलियाने माझ्या मुलाला मारल्याचे सांगितले होते. मला मराठी वाचता येत नसल्याने तो मजकूर पोलीसांनी माझ्या जबाबात का लिहिला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझा व आरोपी मुश्ताकचा घराच्या मालकी हक्कावरून वाद आहे. हे मला माहिती नाही की, माझ्या इतर भावांचा देखील मुश्ताकसोबत घराच्या मालकी हक्कावरून वाद होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरामागे एक मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेचा ताबा आरोपी क्र. १ व २ यांनी जबरदस्तीने घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेवर ते मला जाउ देत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या जागेवर जाण्याचा प्रयत्न केला असता आरोपी क्र. १ व २ यांनी मला शिवीगाळ व मारण्याची धमकी दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझी पत्नी व मुलगा यांच्यावर गुन्हा दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या गुन्हयाची फिर्याद आरोपी क्र. ३ ने दिलेली आहे.

५. हे मला माहिती नाही की, फेब्रुवारी २०१९ ते ऑक्टोबर २०१९ या कालावधीमध्ये आरोपींनी माझ्याविरूद्ध तसेच माझी पत्नी व मुलगा यांच्याविरूद्ध उरण पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केलेल्या आहेत. हे मला माहिती नाही की, दिनांक १३.०१.२०२१ रोजी मला उरण पोलीस ठाण्यामध्ये एक माफीनामा लिहून द्यावा लागला होता. हे मला माहिती नाही की, दिनांक २९.१०.२०२१ रोजी आरोपी क्र. ३ ने माझ्या मुलाविरूद्ध गुन्हा दाखल केला होता.

६. हे मला माहिती नाही की, ज्या ज्या वेळी माझ्या मुलाविरूद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल होत होता त्यावेळी मला व माझ्या पत्नीला देखील पोलीस ठाण्यात बोलावत असत. घटनेच्या दिवशी दुपारी १२.३० वाजता मी घरी होतो. मी मोहम्मद अजीज इमरान ठाकूर या व्यक्तीस ओळखत नाही. त्या दिवशी १२.३० वाजल्यानंतर मी किती वेळ घरात होतो हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझी पत्नी देखील माझ्यासोबत घरी होती. घटनेच्या दिवशी माझी पत्नी पूर्ण वेळ माझ्यासोबत होती काय हे मला आठवत नाही. घटनेच्या दिवशी मी साधारण ११.०० ते ११.३० च्या दरम्यान पोलीस ठाण्यात गेलो. त्यावेळी माझी पत्नी माझ्यासोबत होती. त्यादिवशी पोलीसांनी माझा जबाब नोंदवला काय हे मला आठवत नाही.

७. माझ्या घराच्या व्ह–यांड्याची लांबी रूंदी मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्ह–यांड्याच्या उजवीकडे आरोपींच्या घराचा दरवाजा व डावीकडे माझ्या घराचा दरवाजा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी आरोपीच्या घराच्या दरवाज्यावर सी.सी. टीव्ही कॅमेरा लावलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या कॅमेरामध्ये व्हरांडा दिसतो. हे मला माहिती नाही की, घटनेच्या दिवशी ११.०० ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान मी व्ह–यांड्यामध्ये फिरत होतो. हे म्हणणे

खरे नाही की, त्यादिवशी ११.१४ मिनीटांनी मी बॅटने आरोपी क्र. १ यास मारत होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझ्या हातात बॅट होती. हे मला माहिती नाही की, माझ्या मुलाच्या अंगावर पाच जखमा होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाला झालेल्या जखमा माझ्यासमक्ष झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्याबाबत पोलीसांना काही सांगितले नाही. मी उपचार घेतले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मुद्देमाल आर्टीकल अ यास सलिया म्हणत नाहीत.

८. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०३.२०२० रोजी आरोपींनी मला, माझ्या मुलास व पत्नीस मारहाण केलयाचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझा मुलगा व पत्नी रूग्णालयात उपचारासाठी गेल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपीचे पूर्वीपासून वाद असल्याने मी आरोपींविरूद्ध खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (विकास डी. बडे)

दिनांक – ०४.०७.०२०२३ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

रे.के.नं. २२/२१
नि.क्र. ३८/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ याची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | अजिज इरफान ठाकूर |
| वय | – | २६ वर्षे |
| व्यवसाय | – | व्यापार |
| राहणार | – | मस्जिद मोहल्ला, ता. उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. कदम यांच्यामार्फत...</u>**

१. फिर्यादी माझी आई आहे. आरोपी जावेद, आसिफ माझ्या काकाची मुले आहेत. रेहाना माझी वहिनी असून मुश्ताक माझा काका आहे. आम्ही एका घरात वेगवेगळ्या खोल्यांमध्ये राहतो. आमच्या घराच्या पाठीमागील वाड्याच्या जागेवरून आरोपींसोबत आमचा साधारण ४ ते ५ वर्षांपासून वाद आहे.

२. दिनांक १७.०३.२०२० रोजी सकाळी १०.३० ते ११.०० वाजण्याच्या सुमारास मी घरातून निघालो. त्यावेळी घरामध्ये माझी आई, वडील व काकाचा मुलगा अरफान हा होता. त्यावेळी मी घराचा उघडलेला दरवाजा बंद न झाल्याने काकाचा मुलगा जावेद मला शिवीगाळ करू लागला. मी काय झाले विचारले. त्यावेळी माझे आईवडील व काकाचा मुलगा आवाज ऐकून बाहेर आले. त्यावेळी आरोपींनी आम्हाला थेट मारायला सुरूवात केली.

३. मला आरोपी जाबीरने लोखंडी पाईपने डोक्यात व हातापायावर मारले.

त्यामुळे माझ्या डोक्यात जखम झाली. माझ्या वडीलांना काका व त्याच्या मुलाने हाताने मारहाण केली. माझ्या आईला मुश्ताकने हाताने मारले. त्यावेळी अरफाज सोडवत होता. आरोपी रेहानाने मला हाताने मारले. त्यावेळी निसार ठाकूर व अरफाज याने आमचे भांडण सोडवले. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेलो.

४. पोलीसांना मी घडलेली घटना सांगितली. त्यांनी मला उपचारासाठी रूग्णालयात पाठवले. मी उरण येथील सरकारी रूग्णालयात उपचारासाठी गेलो. त्यांनी माझ्यावर उपचार केले. त्यावेळी माझ्यासोबत माझे वडील होते. त्यावेळी अफशा नावाची आंटी देखील हजर होती. माझी आई पोलीस ठाण्यात होती. पुढील उपचारासाठी मला वाशी येथे पाठवण्यात आले. तेथे माझ्यावर उपचार करून मला पुढील उपचारासाठी जे.जे.रूग्णालय मुंबई येथे पाठवण्यात आले. तेथे उपचार घेउन मी परत घरी आलो. माझ्या आईने गुन्हयाची फिर्याद दिली.

५. मला मारहाण करण्यात आलेला लोखंडी पाईप लांब व बॉक्स सारखा होता. त्याला कोप–यात वेल्डींग केलेला सलिया होता. तो मी दाखवल्यास ओळखू शकतो. पोलीसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती. मुद्देमाल आर्टीकल अ साक्षीदारास दाखवण्यात आला. त्यानेच मला आरोपीने मारहाण केली. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. गांगण यांच्यामार्फत...</u>**

६. पोलीसांनी मला उपचारासाठी जाताना सोबत यादी दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आज माझा न्यायालयात जबाब नोंदवण्यापूर्वी घटनेबाबत माझ्याकडे कोणीही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ज्या वेळी माझ्याविरूद्ध पोलीस ठाण्यात तक्रारी झाल्या त्यावेळी पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात बोलावल्यावर मी तेथे हजर झालो आहे.

७. सफा अमिन पटेल ही माझी पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिला रहिमा नावाची बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिने माझ्याविरूद्ध विनयभंग केल्याबाबत फिर्याद उरण पोलीस ठाण्यात दाखल केली होती. हे मला माहित नाही की, त्यावेळी आरोपींचे माझी पत्नी व मेहुणी रहिमा हिच्यासोबत बोलणे चालू असायचे. माझी बायको आरोपींसोबत माझ्या पाठी बोलत असू शकते. माझी पत्नी माझ्यासोबत नांदत नाही.

८. घटनेच्या वेळी माझी पत्नी माझ्यासोबत माझ्या घरी नव्हती. माझी पत्नी मला तिच्या माहेरी राहण्यासाठी आग्रह करत होती व त्यामुळे ती माहेरी राहात होती.

९. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २९.१०.२०१९ रोजी आरोपी मुश्ताकने माझ्याविरूद्ध उरण पोलीस ठाण्यात अंगणात बोकड बांधण्याच्या वादावरून अदखलपात्र गुन्हा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आज साक्ष देताना हे मला माहिती आहे की, आरोपी मुश्ताकने माझ्या व माझ्या आईवडीलांविरूद्ध उरण पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या आहेत.

१०. फिर्यादी आज माझ्यासोबत न्यायालयात हजर आहे. हे मला माहित नाही की, एप्रिल २०२३ मध्ये माझ्या आईवडीलांविरूद्ध भा.दं.वि. कलम ३२६ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, समन्स आल्यानंतर आज माझी आईसोबत कोर्टात कशासाठी जायचे आहे याबाबत चर्चा झाली.

११. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींविरूद्ध माझ्या आईने मला मारहाण केल्याबाबत फिर्याद दाखल केल्याचे मला दिनांक १७.०३.२०२० रोजीच माहित होते. फिर्याद दाखल केल्याचे समजल्याची वेळ मला सांगता येत नाही. परंतु ती वेळ दुपारची होती. हे म्हणणे खरे आहे की, आईने आरोपींविरूद्ध फिर्याद दिल्याचे समजले त्यावेळी मी उरण रूग्णालयात नव्हतो. उरण रूग्णालयात माझी चौकशी करण्याकरीता

पोलीस आले नव्हते.

१२. हे म्हणणे खरे नाही की, उरण रूग्णालयात मला जखमा कोणत्या कारणास्तव झाल्या हे सांगितले नव्हते. मी उरण येथील रूग्णालयात साधारण ११.०० ते ११.१५ वाजण्याच्या दरम्यान पोहोचलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी उरण येथील रूग्णालयात पोहोचलो त्यावेळी माझ्या डोक्यात दोन जखमा झालेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जखमांमधून रक्तस्त्राव होत होता.

१३. मी आज न्यायालयात आल्यानंतर सरकारी वकीलांकडे कोणत्या खटल्यासंदर्भात साक्ष द्यायची आहे याबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात आल्यानंतर दिनांक १७.०३.२०२० रोजीच्या घटनेबाबत साक्ष द्यायची आहे हे मला समजले. हे म्हणणे खरे नाही की, आज मला न्यायालयात आल्यानंतर दिनांक १७.०३.२०२० रोजी काय घटना घडली तसेच मला व आईला कोणी मारले हे सांगण्यात आले. पोलीसांनी जे.जे.रूग्णालयात मला विचारपूस केली त्यावेळी लिहून घेतले होते. ते पोलीस मुंबईचे होते. हे म्हणणे खरे आहे की, आईने फिर्याद दिल्यानंतर मी मला झालेल्या मारहाणीची माहिती देण्याकरीता पोलीस ठाण्यात गेलो नाही. पोलीसांनी मला बोलावले नाही म्हणून मी जबाब देण्यासाठी गेलो नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, जेव्हाजेव्हा आरोपींनी माझ्या आईवडीलांना मारहाण व शिवीगाळ केली त्यावेळी मी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून पोलीस ठाणे साधारण २ ते ३ मिनीटांच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घराच्या पुढच्या वरांड्यात सी.सी. टीव्ही कॅमेरा लावलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आईने दिलेली फिर्याद मला वरांड्यात मारहाण केल्याबाबत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी वरांड्यात कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरांड्यात मला

मारहाण झालेली नाही.

१५. असे काही घडले नाही की, मी घटनेच्या दिवशी ११.०० ते ११.१५ च्या सुमारास बाहेरून वरांड्यात येत होतो.

१६. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडल्यापासून माझी व आईची घटनेबाबत चर्चा झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुद्देमाल आर्टीकल अ ओळखण्याचे मला आज कोणतेही कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मुद्देमाल आर्टीकल अ ने मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या डोक्यात झालेल्या जखमा आरोपींनी केलेल्या मारहाणीमुळे झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मला झालेल्या जखमा आरोपींनी केलेल्या मारहाणीत झालेल्या नसल्याचे मला माहिती असल्याने मी आजपर्यंत पोलीसांना जबाब दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आईने आरोपींविरूद्ध फिर्याद दाखल केल्याचे मला समजल्याने आईच्या सांगण्यावरून मी आज आरोपींविरूद्ध खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचा गुन्हयाशी काहीही संबंध नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (विकास डी. बडे)

दिनांक – ०१.०८.०२०२३ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण